

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

•बीड (महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक १३६ •शुक्रवार, दि. १५ ऑगस्ट २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रुपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955


# फुल्ल पगारी अन् बिनकामाचा अधिकारी



## शासनाचा पगार खाजगी कार्यालयातून कारभार करणाऱ्या किरण देशमुख यांची दादा सुट्टी कधी होणार ?

### मागील सहा महिन्याचे सीसीटीव्ही नगरपालिकेचे तपासा ; भ्रष्ट अधिकाऱ्यांना वरदहस्त हसणाऱ्यांचे काने टोचा !



**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिकेचे सर्वात भ्रष्ट अधिकारी म्हणून नावाजलेले बांधकाम विभागाचे अभियंता किरण देशमुख यांना नगरपालिकेत दाखवा व एक लाख रुपये मि ळवा अशी योजना सुरू करावी लागणार असल्याचे दिसून येत आहे. मागील सहा महिन्यात बीड नगरपालिकेत बांधकाम विभागात न येता कोट्यावधी रुपयांची बिले अदा करण्याची अनोखी पद्धत फक्त बीड जिल्ह्यातच पाहायला मिळत आहे. बांधकाम विभागाचे अभियंता किरण देशमुख यांना नगरपालिकेची एलर्जी असेल तर खुशाल राजीनामा द्यावा नसता अशा भ्रष्ट अधिकाऱ्यावर कारवाई करत सेवेतूनच बडतर्फ करण्यात यावे. जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहणासाठी बीड येथे येत आहे. बीड मधील गुंडगिरी मोडून काढण्याची भाषा व हिम्मत फक्त राज्यात अजितदादा यांच्यातच आहे. मागील दौऱ्यात बीड शहरातील चकाचक झालेले रस्ते प्रशासकीय अधिकाऱ्यांची होणारे धावपळ यातून एकच गोष्ट बीड कराना जाणवते ती म्हणजे दादांचा रुबाब व तात्काळ निर्णय घेण्याची क्षमता. बीड नगरपालिकेत मागील काही काळापासून नगरपालिका फंडाची वाट लावण्याचे काम भ्रष्ट असलेले अभियंता किरण देशमुख यांनी लावली आहे. तत्कालीन मुख्याधिकारी नीता अंधारे यांचे खरे हस्तक असलेले किरण देशमुख यांना बीड नगरपालिकेची एलर्जी आहे का ? बीड नगरपालिकेत कधीही ▶▶ उर्वरित पान २ वर

**• मागील तीन महिन्याचे सीसीटीव्ही तपासा**

**बीड नगरपालिकेत असणारे सीसीटीव्ही तपासले असता किरण देशमुख यांचा खरा चेहरा उघड होईल. नगरपालिकेत न येता खाजगी कार्यातून कारभार करणारे किरण देशमुख नेमके कोणाचे जावई आहेत . उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे असणाऱ्या नगर विकास मंत्रालय अशा मुजोर धिकार्यावर कारवाई कधी करणार. बीड नगरपालिकेचे मागील तीन महिन्याचे सीसीटीव्ही व त्यांच्या कार्यालयातील सीसीटीव्ही तपासणी करा म्हणजे किरण देशमुख किती दिवस किती वेळा कार्यालयात येतो हे कळेल. नगरपालिकेच्या नावाने बोट मोडणाऱ्या किरण देशमुख यांना भ्रष्टाचाराचा पैसा मात्र हजर होतो. दादा अशा अधिकाऱ्यांचे लाड का ?**

**• किरण देशमुख याच्या विरोधात तक्रारींचा पाऊस**

**नगरपालिका फंडाची विल्हेवाट लावणाऱ्या किरण देशमुख व नीता अंधारे यांच्या विरोधात कठोर कारवाई प्रशासनाने कधीही घेतली नसल्याने अशा अधिकाऱ्यांची मजुरी वाढत आहे. किरण देशमुख यांच्या विरोधात तक्रारींचा पाऊस असतानाही त्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी जिल्हा नगरपालिका प्रशासनाला एवढा उशीर का होत आहे. किरण देशमुख यांनी आता केलेली बिलांची ऑडिट व लेखापरीक्षा करणे आवश्यक झाले आहे. तक्रारींचा पाऊस असतानाही व नगरपालिकेत न जाता खाजगी कार्यालयातून कामे करणारे किरण देशमुख यांच्यावर कोण मेहरबान आहे .**






## नाईक जरांगेंना भेटले, जरांगे म्हणाले, आम्हालाही मुंबईत गणपती बसवू द्या

### आज मंत्र्यांची बैठक, जरांगेंचे आदोलन आणि मराठा आरक्षण याबाबत होणार चर्चा



**लातूर । प्रतिनिधी**

आम्हाला आमचं हक्काचं आरक्षण द्या, आमच्या मागण्या मान्य केल्या तर मुंबईला येण्याचा प्रश्नच नाही. जे आश्वासन या आधीच्या आंदोलनादरम्यान दिले ते पूर्ण करत नाहीत, ज्यांच्या कुणबी नोंदी सापडत आहेत त्यांना प्रमाणपत्र देणे बंद केले आहे, असे म्हणत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील २९ ऑगस्टला मुंबईला जाण्यावर ठाम असल्याचे आज पुन्हा एकदा स्पष्ट झाले. मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी आज लातुरात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक हे आले होते. त्यावेळी जरांगेंसोबत चर्चा करत आपल्या सर्व भावना सरकारकडे पोहचते करू, ▶▶ उर्वरित पान २ वर






# विना परवाना रस्ता खोदून शासनाचे नुकसान करणाऱ्या अधिकारी व गुत्तेदारांवर गुन्हा दाखल करा

### या मागणीसाठी अंबाजोगाईत जीवन गायकवाड यांचे आमरण उपोषण ; उपोषणाचा तिसरा दिवस

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

एनएच-५४८ डी हा लोखंडी सावरगाव ते सनगाव ग्रामीण रस्ता क्रमांक-११९ विना परवाना रस्ता खोदून जिल्हा परिषद विभागाचे अंदाजे ३० लाख रूपयांचे नुकसान करणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे उपविभागीय अभियंता, शाखा अभियंता व संबंधित गुत्तेदारांवर गुन्हा दाखल करावा या मागणीसाठी अंबाजोगाईत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट) चे जिल्हाध्यक्ष जीवन गायकवाड यांनी १२ ऑगस्ट पासून आमरण उपोषण सुरू केले आहे. काल उपोषणाचा तिसरा दिवस होता. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट) राष्ट्रीय अध्यक्ष सचिन खरात, मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय भुंबे यांच्या नेतृत्वात बीडचे जिल्हाध्यक्ष जीवन श्रीपती गायकवाड यांनी १२ ऑगस्ट रोजी उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, ▶▶ उर्वरित पान २ वर



### अजित पवार यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण ; कार्यक्रमास उपस्थित राहावे- जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ७९ व्या वर्धापन दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे मंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते शुक्रवार, दि. १५ ऑगस्ट, २०२५ रोजी सकाळी ९.०५ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथील प्रांगणात होणार आहे. तसेच मुख्य शासकीय
















# स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा....



१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला देश परकीय सत्तेतून मुक्त झाला. ७९ वा स्वातंत्र्यदिनाचा उत्सव साजरा करत आहोत. पण प्रश्न अजूनही जिवंत आहे. आपण खरंच स्वतंत्र आहोत का? खर स्वातंत्र्य कोणतं? खरं स्वातंत्र्य म्हणजे केवळ राजकीय सीमा नव्हे– स्वातंत्र्य म्हणजे विचारस्वातंत्र्य, न्यायाचा हक्क, संधीची समानता, आणि प्रत्येकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळाला पाहिजे. आज आपल्यावर आता कुठलाही परदेशी राजा राज्य करत नाही, पण आपल्या मनावर भ्रष्टाचाराचं राज्य आहे. आपण परकीय सत्तेतून बाहेर पडलो, पण अजूनही बेरोजगारी, अज्ञान, गरिबी, जातीवाद, लाचखोरी, आणि अन्याय यांच्या कैदेत अडकलो आहोत. स्वातंत्र्य ही केवळ परकीय सत्तेतून मुक्तता नाही – तर विचार, संधी, न्याय, आणि जबाबदारी यांचंही स्वातंत्र्य असतं. आजची वस्तुस्थिती पाहिली तर –राजकीय नेत्यांमधील स्वैराचार : सत्तेचा वापर सेवेसाठी न करता वैयक्तिक फायद्यासाठी होणं, हा स्वैराचारच आहे. जनतेचं पारतंत्र्य : भ्रष्टाचार, अर्धवट माहिती, बेरोजगारी, आणि मतांचे ध्रुवीकरण यामुळे लोक विचार स्वातंत्र्या पासूनही वंचित होतात. प्रशासकीय विलंब व भ्रष्टाचार : लोकांना हक्क मिळवण्यासाठी अजूनही नको त्या प्रक्रियांत अडकावं लागतं. राजकारणावर पैशाचं व गुंडगिरीचं वर्चस्व : ज्यामुळे खऱ्या अर्थाने तळागाळातील प्रामाणिक नेतृत्व कमी होतं चाललय. भविष्यात हि बाब गंभीर ठरणार. खरं स्वातंत्र्य मिळवण्या साठी वैचारिक परिवर्तनाची गरज आहे. या परिवर्तना बरोबर काही मूलभूत बाबीवर प्रभावीपणे लक्ष द्यावे लागेल.

१. शिक्षणाची समान संधी व उच्च गुणवत्ता वृध्दींगत करणे. आणि नागरिक सजगता वाढवणं अत्यावश्यक आहे. २. लोकशाहीतील उत्तरदायित्व निश्चित करणे, जसे की जन प्रतिनिधींचे कामगिरी व कर्तव्य अहवाल जनते समोर नियमित आणला पाहिजे. ३. न्यायव्यवस्थेची स्वायत्तता वाढवणे. न्यायदानाची प्रक्रिया गतिमान करणे. ४. भ्रष्टाचार विरोधी यंत्रणा राजकीय प्रभावापासून पूर्णपणे मुक्त करणे. ५. भ्रष्टाचारा विरोधात कडक कायदा करून, अमंलबजावणीला प्राधान्य दिले पाहिजे. काही राजकारणी सत्ता ही सेवा न मानता, स्वैराचाराचं साधन मानतात. आणि जनता अजूनही मतांच्या गुलामगिरीत अडकून बसली आहे. आज आपण संकल्प केला पाहिजे– आपण प्रश्न विचारणारे नागरिक होऊ, आपण अन्यायाविरुद्ध आवाज उठवू, आपण लोकशाहीला केवळ मतदानापुरती मर्यादित न ठेवता, ती समृध्द जीवन जगण्याचा मार्ग बनवू. स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सव केवळ स्मृतीपूजन न राहता, तो खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य मिळवण्याचा संकल्प सोहळा व्हावा. देश स्वतंत्र झाला, आता जनतेला खऱ्या स्वातंत्र्याची वेळ आली आहे. प्रचंड त्याग आणि बलिदानातून मिळालेलं हे स्वातंत्र्य सदैव जपुया, भेदभाव, अन्याय, आणि भ्रष्टाचार यांचा अंत करून एकतेच्या, प्रगतीच्या आणि समृद्धीच्या दिशेने पाऊल टाकूया.

माझा देश, माझा अभिमान..! भारत माता की जय!
जय हिंद!

–मारुती तीपाले, बीड

# स्व. विमलताई मुंदडांची आठवण सामान्य लोकांना का येते? लोकसेवेसाठी समर्पित जीवन हेच उत्तर

जन्माला आलेल्या प्रत्येक जीवाला मृत्यू हा नैसर्गिक नियम आहे. पण काही व्यक्ती अशा असतात की, त्यांचा मृत्यू हे सत्य असूनही असत्य भासतो. कारण त्यांच्या कर्तृत्वाच्या खुणा आणि आठवणी लोकांच्या मनातून कधीच पुसल्या जात नाहीत. जिल्ह्याच्या राजकारणात एक काळ स्व. विमलताई नंदकिशोर मुंदडा यांचा होता. तब्बल बावीस वर्षे केज मतदारसंघावर अधिराज्य गाजवणाऱ्या या नेतृत्वाचे राजकारण हे केवळ सर्वसामान्य, गरिबांच्या कल्याणासाठी समर्पित होते. त्यामुळेच त्यांच्या निधनाला अकरा वर्षे उलटून गेली तरी विमलताईंची आठवण आजही अविस्मरणीय आहे.

८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण हे सूत्र डोळ्यासमोर ठेवून त्यांनी विकासाची गंगा मतदारसंघात आणली. विमलताईंच्या आठवणी आजही केज, अंबाजोगाईसह ग्रामीण भागातील चाहत्यांच्या, कार्यकर्त्यांच्या मनामनात जिवंत आहेत. त्यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांच्या निमित्ताने साजरा केला जात असे. त्यांनी सुरू केलेली व्याख्यानमाला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचली. आज त्यांचा राजकीय वारसा त्यांच्या सुनबाई आमदार सौ. नमिताताई मुंदडा या अक्षय मुंदडा यांच्या सहकार्याने समर्थपणे पुढे नेत आहेत, तर नंदकिशोर मुंदडा यांचा अनुभवी मार्गदर्शनाचा हात विमलताई यांच्या नंतर मुलगा आणि सुनेवर कायम आहे.

बीड जिल्ह्याच्या राजकारणात अनेक घराणी होती, आहेत आणि पुढेही असतील. परंतु विमलताईंचा राजकीय प्रवास हा वारशातून नव्हे, तर स्वकर्तृत्वातून घडला. तत्कालीन काळात स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या माध्यमातून त्यांचा राजकीय प्रवास सुरू झाला. साधारण १९८६–८७ मध्ये राजकारणात दाखल झाल्यानंतर निष्ठा आणि नेतृत्व कसे जपावे हे त्यांनी दाखवून दिले. दहा वर्षे भाजप आणि नंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून त्यांनी प्रत्येक



पंचवार्षिक निवडणुकीत विक्रमी मतांनी विजय मिळवला. त्यांचे राजकारण हे सर्वसामान्यांना समर्पित होते. जनतेच्या सुखदुःखात सहभागी होऊन त्यांनी राजकारण केले. मतदारसंघातीलच नव्हे तर जिल्हाभरातील लोकांसाठी त्यांचे घर २४ तास खुले असायचे. तेव्हाचे राजकारण साधे, कार्यकर्ते जीवाभावाचे आणि लोक विश्वासू होते. केज मतदारसंघ अत्यंत मागासलेला असताना रस्ते, वीज, पाणी अशा मूलभूत गरजांकडे त्यांनी लक्ष दिले. त्यांच्या राजकारणात कधीही सूड किंवा द्वेष नव्हता. त्यांच्या दारी आलेला माणूस रिकाम्या हाताने कधी परत जात नसे.

अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयातील सुविधा वाढवणे, सीताफळ संशोधन केंद्र, कृषी महाविद्यालयाची स्थापना, तसेच अंबाजोगाई जिल्हा करण्यासाठी त्यांनी मंत्रीपदाच्या काळात केलेली तरतूद ही त्यांची मोठी देणगी आहे. अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय, अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालय, आरटीओ कार्यालय यांसारख्या शासकीय इमारती त्यांनीच येथे आणल्या. राष्ट्रवादीत प्रवेशानंतर त्यांनी बीड जिल्ह्याचे नेतृत्व केले. आरोग्य राज्यमंत्री, नंतर कॅबिनेट मंत्री म्हणून त्यांनी जिल्ह्याच्या आरोग्य सुधारण्यासाठी मोठी कामगिरी केली. पालकमंत्री म्हणून स्वच्छ, पारदर्शक आणि सुसंवादाचे राजकारण केले. त्यांच्या शांत, मनमिळावू आणि लोकाभिमुख स्वभावामुळे अठरापगड जातीधर्माचे लोक त्यांना मनापासून प्रेम करायचे. त्यांच्या राजकीय प्रवासात नंदकिशोर मुंदडा यांचा सिंहाचा वाटा होता. नियतीने अकाली घाला घातला नसता तर हे नेतृत्व ४०–५० वर्षे मतदारसंघातून दूर झाले नसते. आज त्यांचा वारसा सुना नमिताताई आणि सुपुत्र अक्षय मुंदडा समर्थपणे पुढे नेत आहेत. हे त्रिकुट रात्रंदिवस जनतेच्या कल्याणासाठी कार्यरत आहे. अंबाजोगाईत त्यांच्या पुढाकाराने सुरू झालेली व्याख्यानमाला आजही राज्य पातळीवर गाजत आहे.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करताना त्यांच्या कार्याची आठवण हमखास काढली जाते. गावोगावी त्यांचे सहकारी आहेत आणि आजही त्यांच्या स्मृतीने जुन्या कार्यकर्त्यांचे डोळे पाणावतात. चांगल्या माणसाला देव लवकर का घेऊन जातो याचे उत्तर कदाचित कधी मिळणार नाही. पण एवढे खरे की, या मतदारसंघाला अशा नेतृत्वाची गरज होती आणि आहे. सौ. नमिताताईंच्या चेहऱ्यात आज लोकांना विमलताईंची झलक दिसते. त्यांच्या पुण्यस्मरणानिमित्त मुंदडा कुटुंबीय विविध स्पर्धांचे आयोजन करतात आणि त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो.

लोककल्याणासाठी आपले आयुष्य समर्पित करणाऱ्या या नेतृत्वाची आठवण पुन्हा पुन्हा येत राहणारच.

– राम कुलकर्णी

## स्मरण क्रांतिवीरांचे !


जे लढले होते तेव्हा
आज ते अस्तित्वात नाहीत,
आहेत जे आज ईथे त्यांना
स्वातंत्र्याचे मोलच नाही
दुःखाची झळ सोसली त्यांनी
भविष्याची पर्वा केली नाही,
सुख आज आम्ही उपभोगतोय
आम्हाला त्यांची कदर नाही...
स्वप्न त्यांच्या डोळ्यातले
पारतंत्र्यात कधी साकारले नाही,
त्यांच्या स्वप्नांचे मूल्य
आम्हाला आज कळणार नाही
रक्त सांडले, फास स्वीकारला
जखमांना कधी कुरवाळले नाही,
ध्यास एकची स्वातंत्र्याचा
मोहाचा स्पर्श होऊ दिलाच
नाही...
हसत हसत लढत राहिले
वंदे मातरम् बोलण्यास विसरले
नाही,
मृत्यु समोर उभा असतानाही
माघार त्यांना मान्यच नाही
देशाला केले मुक्त जोखडातून
छळाला त्यांनी जुमानले नाही,
लढले ते वीर क्रांतिकारक
स्वातंत्र्याची फळे त्यांनी
चाखलीच नाही...
स्वातंत्र्य दिनाच्या या पवित्र क्षणी
त्यांना न स्मरून चालणारच नाही
ते लढले म्हणून आज आहोत
आपण
त्यागाविना त्यांच्या आपले
अस्तित्वच नाही

– ज्योती रावराणे,
कांजूरमार्ग, मुंबई

# दैव जाणीले कुन्ही... दुखीता:चा सुखकर प्रवास करणारा वाहक रूग्णांचा जिवनदाता : डॉ औमप्रकाश शेटे साहेब

महाराष्ट्रातील गांवखेड्यातील, तांड्या वस्तीवरील माणसांच्या आरोगाची काळजी घेणारे तसेच गोरगरीब, बंचित, दुर्लक्षीत जनतेच्या सदैव सेवेत्त राहुन शासनाच्या आरोग्य योजनेच्या माध्यमातून रुग्णांना कशी मदत होईल विचार करणारे गोरगरिबांच्या जिवनातील अंधारात प्रकाशाची ज्योत पेठवणारे बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र इदेवदत ओमप्रकाश शेटे साहेब ना जाती साठी ना माती फक्त माणुसकीच्या नात्यासाठी चोवीस तास काम करणारे एकमेव व्यक्तीमत्व आहेत. ते कितीही कामात व्यस्त असले तरी सर्व सामान्य माणसाच्या कामा येणारे काम छोटा असु किवा मोठा सर्वांना समान वागणूक देवून काम करत आहेत. अशा समाजसेवा चंग बांधलेल्या देवदतांचा दि.१५/८/२०२५ वाढदिवस आहे.यदा यदा ही धर्मस्य ग्लानिर शभवतु भारत... जेव्हा जेव्हा मानव धर्मावर संकट येईल तेव्हा तेव्हा पृथ्वी महापुरुषांचा जन्म होत असतो. आगदी त्यांच प्रमाणे आजही समाजात चांगली माणसं नक्कीच आहेत. त्यामध्ये बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र देवदूत ओमप्रकाश शेटे देखील कमी नाहीत, आज मितीला तळगळातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्य ची योजना पोहचणारे आहेत तसेच आयुष्यमान भारत मिशन च्या माध्यमातून लाखो रुग्णांना याचा फायदा झाला व आयुष्यमान मिशनचे माध्यमातून गोरगरिबांना कसं फायदा होईल अनेक समस्या साहेबांनी सोडविले व महाराष्ट्रातील हजारो नवीन हॉस्पिटलचे महात्मा ज्योतिबा फुले अंतर्गत व आयुष्यमान भारत मिशन अंतर्गत हॉस्पिटलची सुरू करण्यात आले जेणेकरून रुग्णांना याचा फायदा व्हावा. माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस साहेबांनी टाकलेला विश्वास सार्थ करत चालणारे विश्वासाला तडा न देणारे डॉक्टर ओम प्रकाश शेटे यांनी महाराष्ट्र सरकारचे मन जिंकले असे सांगण्यात काहीच हरकत नाही

शेटे साहेब यांच्या इतक प्रामाणिक कर्तव्यनिष्ठ काम करणारा व्यक्ती दूसरा कोणीच असु शकत नाही. मी पत्रकारिता करत असतांना त्यांच्या संपर्कात, वासात वेळोवेळी साहून जवळून पाहिले शेटे साहेबांचे नजरे समोर एकच विचार असतो कि आपण समाजाचं काही तरी देणं लागतोत हाच स्वच्छ हेतु डोळ्या समोर ठेवून काम करतात. ते चोविस तासातील सहा तास आराम करतात बाकी तास फक्त अन् फक्त कामात व्यस्त असतात ते नेहमीच्या ऑफिस मधील सहका–यांना सांगतात की जास्तीत जास्त रूणांच्या फाईल मार्गी लाबा, एक फाईल मार्गी लागला म्हणजे एक जिव वाचवला जातोय त्यामुळे त्यांचे पुण्य आपल्याला व आपल्या परिवाराला लागते हे पुण्याचे काम सोबत येते बाकी काहीच नाही. रमजानच्या महिन्यात तलवाडा येथील एक पेशंट संदर्भात अवस्था बिकट झाली होती बीड येथून त्याला छत्रपती संभाजीनगर येथे उपचार कामी घेऊन जाण्यात आले होते परंतु पैसे अभावी मोठी अडचण निर्माण झाली होती व प्रायव्हेट हॉस्पिटलला नेल्यावर आठ लाख ते दहा लाख रुपये खर्च सांगण्यात आला होता परंतु त्या कुटुंबाची परिस्थिती हालाखीची होती त्यांना म्बुलन्सचा भाडा देणे शक्य नव्हतं मग खर्च कुठून करायचा हा मोठा प्रश्न निर्माण झाला होता त्या पेशंट सोबत मी पत्रकार आल्ताफ कुरेशी स्वतः होतो त्यामुळे ह्या सर्व गोष्टीची बाब माझ्या डोळ्यासमोर आहे. आज मी डॉ औम प्रकाश शेटे साहेबांना रात्रीचे तीन वाजता फोन केला व फोन कधी करत नव्हतो दहा वर्षात या पेशंटची परिस्थिती बघून मी तात्काळ साहेबांना कॉल केला शिल्पाताई साहेबांनी कॉल उचलला बोला आल्ताफ काय झालं मी ताई साहेबांना सांगितलं साहेबांना उठवा एक रुग्णांचा जीव वाचवायचा आहे. त्यांची



परिस्थिती हालाखीची आहे साहेब उठले बोल आल्ताफ काय झालं साहेबाला मी सांगितले सारी हकीकत साहेबांनी तात्काळ यंत्रणा हलविले व त्या पेशंटला घाटी मध्ये आयुष्य मध्ये तात्काळ शिफ्ट करण्यात आले व आज ते पेशंट कुटुंबासोबत हसत खेळत राहत आहे. हे सर्व साहेबांचे सहकार्यामुळे घडलेले हे मी स्पष्ट करीत आहोत जीवन देणारा देव असतो अल्ला असतो परमेश्वर असतो परंतु त्याला साथ देणाऱ्या माणूसच असतो हे खरं चित्र पाहाव्यास मिळाले शेटे साहेब म्हणतात त्यामुळे मानवी जीवनात असे वेळोवेळी मार्गदर्शन करतांना आवर्जून सांगतात, म्हणतात ना यशस्वी पुरुषांच्या पाठिमागे एक स्त्री शक्तीचा हात असतो. त्यांच त्यांच्या प्रमाणे यशाात मुविद्यपत्नी शिल्पाताई ओमप्रकाश शेटे यांची खंबीर साथ असल्याने सर्व काही शक्य आहे. आजही आपल्या कुटुंबातील एखाद्या व्यक्तीने जात वेळ दिला तर आपल्या कुटुंबात जमत नाही मग खरोखरच त्यांना साथ देणारी पत्नीला आपल्या सलाम करतोय साहेबांना कधी हि फोन लावला तर काम होत पण मंत्रालय मध्ये असले तरी तर साहेब सांगतात की मी मिटींग मध्ये आहे मी तुला मिटीग संपल्याचर फोन करतोय आल्ताफभाई असे सांगतात अनु काही क्षणात वेळ मिळालाकीच फोन करतात आणि समस्या जाणुन घेतात. तसेच सौ. शिल्पाताई यांनी देखील कधीच मला परख समजिले नाही. मी माझ्या जिवनात ओमप्रकाश शेटे व त्यांच्या परिवाराला कधीच विसरू शकत नाही. माझ्या सारखे छोटे शेटे समर्थ यांनी सुद्धा एक रुपया कोणाचा सुद्धा खाललेला नाही कारण आमचे शेटे साहेब नेहमी म्हणता की आपण कोणाला फसविले नाही तर आपल्याला जिवनात काही कमी पडणार नाही असे मानसिकता ठेवणारे साहेब मुख्यमंत्री साहायता निधी कक्ष चालु करणारे एकमेव डॉ ओमप्रकाश शेटे यांनी सातव्या मजल्यावर सुरू केले भाजपाचे सत्तेत त्यांनी कोटी ने रुग्णांना मोफत उपचार मिळुन दिले महाराष्ट्रात नव्हे तर त्यांनी दिली येथे आपला नाव सोनेरी अक्षरात लिहून दाखविले महाराष्ट्र चांगल्याप्रकारे काम केल्याने त्यांना भारतात काम करण्याची संधी मिळाली आज आरोग्य, कुटुंब कल्याण मंत्री भारतीताई यांचे खाजगी सचिव म्हणून डॉ ओमप्रकाश शेटे यांची निवड करण्यात आली होती आज आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी सध्या कार्यरत आहे.पैसे अभावी कोणाचाही जिव जाऊ नये म्हणून अहोरात्र रुग्णांची मदत करणारे डॉ ओमप्रकाश शेटे यांना वाढदिवसाच्या मनस्वी खुप खुप शुभेच्छा !

**वाढदिवस अभिष्टचिंतन लेख**
**– डॉ ओमप्रकाश शेटे यांचे विश्वासू पत्रकार**
**आल्ताफ नसीर कुरेशी, तलवाडा**

◆ पान १ वरून पुढे...

## फुल्ल पगारी...

न येता आपल्या खाजगी कार्यातून नगरपालिकेचा कारभार पाहणारे शासकीय कर्मचारी किरण देशमुख पहिलेच. अनेक बोगस कामांना किरण देशमुख यांचा पाठिंबा नगरपालिकेच्या फंडात घातलेला गोंधळ यासह नगरपालिकेत न येता खाजगी कार्यातून करत असलेले कारभार हाच चर्चेचा विषय ठरत आहे. पालकमंत्री अजितदादा आशा भ्रष्ट फुल्ल पगारी मात्र बिनकामाचा अधिकारी असलेल्या किरण देशमुख यावर कारवाई करणार का ?

## नाईक जरांगेंना...

असे म्हणत उद्या याबाबत बैठक असल्याचे म्हटले. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आंदोलनाचे अस्त्र उगारले. २९ ऑगस्ट रोजी जरांगे लाखो मराठ्यांच्या सोबत मुंबईत डेरेदाखल होत आहेत. त्या अनुषंगाने आज लातूरमध्ये त्यांच्या बैठका सुरू आहेत. याच दरम्यान राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. सणासुदीचे दिवस आहेत. मुंबईत गणेशोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो, अशा स्थितीत मुंबईला तुम्ही येणे अवघड होईल. आरक्षणाचा प्रश्न सरकार सोडत आहे, असे प्रताप सरनाईक यांनी म्हटल्यानंतर, जरांगे पाटील यांनी आम्हाला एकदा मुंबईत गणपती बसवू द्या, तिथे पुजाअर्चा करू द्या, आम्ही तिते ग्रामीणचा राजा गणपती बसवू, या कालावधीत जे काही कार्यक्रम घ्यायचे आहेत, त्यासाठी आमच्यासोबत भजनी मंडळ

◆ पान १ वरून पुढे...

आहे, चांगले चांगले कीर्तनकार आहेत, शाहीर आहेत, आम्हाला एकदा श्रीगणेशाचे विसर्जन समुद्रात करू द्या, असे म्हणत जरांगे यांनी आपण २९ तारखेला मुंबईत येण्याबाबत ठाम असल्याचे चर्चेतून दाखवून दिले. या वेळी प्रताप सरनाईक यांनी उद्या बैठक आहे, या बैठकीत आपल्या भावना त्याठिकाणी सांगू, असे म्हटले. सरकार मराठ्यांबाबत कसे दुटप्पी वागतं, मराठ्यांच्या आरक्षणाबाबत कशा अडचणी निर्माण करतं, यासह अन्य बाबी आणि अडचणी जरांगे यांनी सरनाईक यांच्यासमोर बोलून दाखविले.

## विना परवाना...

एनएच–५४८ डी हा लोखंडी सावरगाव ते सनगाव ग्रामीण रस्ता क्रमांक–११९ हा पाईपलाईन कामासाठी विना परवानगी खोदून जि.प.बांधकाम विभागाचे अंदाजे ३० लाख रूपयांचे नुकसान करणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे उपविभागीय अभियंता, शाखा अभियंता आणि संबंधित गुत्तेदार होळंबे यांच्यावर गुन्हा दाखल करून शासनाचे नुकसान झालेली ३० लाख रक्कम वसूल करून सदरील एजन्सी ब्लॅक लिस्ट करणे बाबत वेळोवेळी निवेदन देऊन याप्रश्नी रस्ता रोको, मोर्चा सारखी आंदोलने करून दोषींविरुद्ध कारवाई करण्याबाबत आपल्या कार्यालयाकडे मागणी केली होती. परंतु, कोणत्या तरी दबावापोटी अद्यापपर्यन्त कसल्याही प्रकरची कारवाई झाली नसल्याने दिनांक १२ ऑगस्ट २०२५ रोजी पासून उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसत आहे. असे निवेदनात नमूद केले आहे. सदरील निवेदनात संबंधित अधिकारी

◆ पान १ वरून पुढे...

व गुत्तेदार यांची नांवे नमूद केली आहेत. याच प्रश्नी ९ मे २०२४ रोजी जिल्हा परिषद उपविभाग, अंबाजोगाईचे उपअभियंता आर.बी.काळे यांनी संबंधित गुत्तेदाराने खोदकाम केलेल्या जागेचा रितसर पंचनामा केला होता. १६ मे २०२४, १७ मे २०२४, २२ मे २०२४ रोजी पत्र दिले. तर १८ जुन २०२४ रोजी रास्ता रोको आंदोलन बाबतचे निवेदन दिले. २० जुन २०२४ रोजी जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, अंबाजोगाई यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे उपअभियंता यांच्याशी पत्रव्यवहार केला, त्यानंतर २५ जुन २०२४ रोजी एक महिन्यात नुकसान झालेल्या रस्त्याचे डांबरीकरण करून देवूत असे हमीपत्र संबंधित गुत्तेदार यांचा प्रतिनिधी आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडून देण्यात आले. म्हणून जीवन गायकवाड व त्यांच्या सहकाऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन केले नाही. तरी परंतु, आजपावेतो नुकसान झालेल्या रस्त्याचे डांबरीकरण झालेले नाही. नादुरूस्त रस्त्याचा त्रास शालेय विद्यार्थी, वयोवृद्ध नागरिक, दिव्यांग व्यक्तींना होत आहे. असे असले तरी या प्रकरणी दोषींविरूद्ध कारवाई होत नाही तोपर्यन्त आमरण उपोषण सुरू राहील. काही अनुचित प्रकार घडल्यास सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची दक्षता घ्यावी. असे निवेदनात नमूद करून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट) चे जिल्हाध्यक्ष जीवन गायकवाड यांनी १२ ऑगस्ट पासून आमरण उपोषण सुरू केले आहे. उपोषणाचा कालचा तिसरा दिवस आहे. मागील ३ दिवसांत गायकवाड यांच्या आमरण उपोषणाला जनता, विविध सामाजिक संघटना यांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळत असल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे उपविभागीय

◆ पान ४ वरून पुढे...

अभियंता, शाखा अभियंता व संबंधित गुत्तेदारांवर गुन्हा दाखल केला नाही. तर जनहितार्थ तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट) चे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय भुंबे यांनी दिला आहे.

## लोकनेते विनायकराव...

डॉ. ज्योती विनायकराव मेटे, प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, ज्येष्ठ नेते नारायणराव काशीद,जिल्हाध्यक्ष प्रा सुभाष जाधव, बी.बी.जाधव, अनिल घुमरे, सुहास पाटील, संजय पवार, प्रमोद कुलकर्णी, राजेश भुसारी, गोरख शिंदे, सचिन शिंदे, सय्यद रौफ आणि नवनिर्वाचित वकील संघाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

## राजवीरच्या आकस्मिक...

करणारे डॉ.जाणवळे यांच्या लक्षात आलं त्यांनी उपचार केले मात्र प्रतिसाद मिळाला नाही नंतर पालकांनी राजविरला गीताई हॉस्पिटलमध्ये दाखल केले मात्र राजवीरची प्रकर्ती गंभीर झाली व त्यातच उपचार सुरू असताना १३ ऑगस्टला दुपारी १२:३० वाजता त्याचं दुःखद निधन झालं . त्याच्यावर भगवान बाबा प्रतिष्ठान येथे जड अंतकरणाने अंत्यसंस्कार करण्यात आले. – शहरातील नामवंत शासकीय गुत्तेदार व भवानवाडी येथील नानासाहेब जाधव यांच्या पुतनीचा मुलगा राजवर्धन होता या निधनाबद्दल जाणीव प्रतिष्ठान वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# शिक्षण संस्थेच्या माध्यमातुन सोमनाथ बडेंनी डोंगरपट्यात गरिबांच्या दारात ज्ञानाची गंगा आणली : राम कुलकर्णी

**वडवणी । प्रतिनिधी**

संतश्रेष्ठ भगवानबाबा ईश्वरी अवताराचं स्वरूप असुन तत्कालीन काळात त्यांनी शिक्षणाचे महत्व पटवुन देताना स्वत:च्या जीवनाचा उद्धार करण्यासाठी काहीही करा पण लेकरांना शिक्षण द्या ही त्यांची शिकवण समाज उद्धारासाठी कामी आल्याचे प्रतिपादन भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी करताना चिंचवण डोंगरपट्यात सोमनाथ बडेंनी शिक्षण संस्थेच्या माध्यमातुन गरिबांच्या दरवाजात ज्ञानाची गंगा आणली. परोपकारी स्वभाव



असल्याने त्यांच्यावर सर्वसामान्य माणसं प्रेम करतात असं त्यांनी सांगितले. मक्रध्वज शिक्षण संस्था संचलित भगवानबाबा माध्यमिक विद्यालयात ध्वजारोहण प्रसंगी प्रवक्ते बोलत होते. कार्यक्रमाच्या

अध्यक्षस्थानी आसाराम बडे, सोमनाथ बडे, नवनाथ तांबडे, अरूण बडे, शेख आबेद, श्रीमंत तांबडे, अर्जुन पौळ, विष्णु डोंगरे, दत्तु तुरे, इंद्रसेन बडे, यशवंत धायतिडक, नारायण बडे, शहादेव बडे, बद्रीनाथ म्हात्रे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. राम कुलकर्णी यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहण झाल्यानंतर शाळेच्या वतीने मान्यवरांचा शाल, श्रीफळ देवुन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातुन उपसरपंच मयुर बडे यांनी संस्थेच्या गुणात्मक कार्याचा आढावा सादर केला. प्रसंगी बोलताना सोमनाथराव बडे म्हणाले की, शिक्षण संस्था ज्या उद्देशापोटी स्थापन केली, तोच आदर्श डोळ्यासमोर ठेवत आम्ही काम करतो. गुणवत्तेच्या बाबतीत आमची शाळा डोंगरपट्यात चांगलं काम करत असुन त्याचे श्रेय मुख्याध्यापक, शिक्षकांना जाते. गोरगरिबांच्या सुखदु:खात जगणं हाच माझा खरा धर्म असुन लोकांचं प्रेम वर्षानुवर्षापासुन मला मिळतं त्याचा खुप आनंद वाटतो. मार्गदर्शनपर बोलताना प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात अहिल्यादेवी होळकरांचा संदर्भ देत त्यांचं चरित्र मुला-मुलींनी वाचन करावं. तत्कालीन काळात त्यांनी कशा प्रकारे जीवन जगताना जनकल्याणाची कामे केली?एक महिला कर्तृत्वाच्या आधारावर प्रदेशाचा कारभार आदर्शवत कशी करते?, दु:ख कितीही नशिबाला आलं तरीही शुद्ध भाव कर्माने त्यावर सामना करत धार्मिकतेच्या आधारे भारतीय संस्कृती टिकवुन ठेवताना त्यांनी ज्योतिर्लिंगाचा केलेला जीर्णोद्धार त्यांची पुस्तके वाचुन प्रेरणा घेतली तर बालवयातच आयुष्यात पुढे जाण्यासाठी यश निश्चित मिळते. संतश्रेष्ठ भगवानबाबांनी संपुर्ण आयुष्य जनकल्याणासाठी समर्पित करताना ऊसतोड कामगार असो किंवा समाजातील अठरापगड जातीधर्माच्या उद्धारासाठी दिलेले योगदान फार मोठं एकरभर विका पण मुलं-मुली शिकवा हा त्यांचा संदेश खर्या अर्थाने जनकल्याणाच्या अत्यंत हिताचा होता. त्यांच्याच नावाने इथे शाळा चालवताना बाबांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवत सोमनाथ बडेंनी आयुष्यात गोरगरिबांची केलेली सेवा लोक कधीच विसरत नाहीत. सत्ता असो अथवा नसो त्यांच्या पाठीशी गोरगरिबांचा आशिर्वाद असतो. त्याचे कारण चिंचवण डोंगरपट्यात त्यांची नाळ सामान्य जनतेसोबत जोडलेली हे निश्चितच म्हणावी लागेल. बडे कुटुंब वारकरी संप्रदाय मार्गाचे अनुकरण करताना कष्ट आणि प्रामाणिकपणा हाच या परिवाराचा फार मोठा सद्गुण असल्याचेही कुलकर्णींनी सांगितले. मयुर सारखा तरूण या भागात ग्रामपंचायतीच्या माध्यमातुन नेतृत्व करतो. त्याचं भविष्य उज्वल असल्याचेही संकेत त्यांनी दिले. कार्यक्रमाला मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, गावातील प्रतिष्ठित, पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# पत्रकार बाळासाहेब आडागळे व अभिनेत्री प्राची सोनवणे यांना सत्यशोधक पुरस्कार जाहिर!

### अभिनंदनिय : उल्लेखनिय कार्याची दखल

**माजलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र आधार सेना सामाजिक संघटना व दैनिक महाराष्ट्र आरंभ यांच्या संयुक्त विद्यमाने यांच्याकडून विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या व्यक्तींना लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी सत्यशोधक पुरस्कार देवून गौरव केला जातो. यावर्षीचा सत्यशोधक पुरस्कार पत्रकार बाळासाहेब आडागळे व अभिनेत्री प्राची सोनवणे यांना घोषित झाला आहे. हा पुरस्कार



मा.पालकमंत्री धनंजय मुंडे, मा. आ. अमरसिह पंडित यांच्या सह विविध मान्यवरांच्या उपस्थितीत बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे येत्या रविवार (दि.१७) रोजी प्रदान केला जाणार आहे.अशी माहिती महाराष्ट्र आधार सेना संघटना चे संस्थापक अध्यक्ष संपादक दिपक थोरात यांच्याकडून देण्यात आली आहे.

बीड जिल्ह्यातील माजलगाव येथेल रहिवाशी असलेले पत्रकार बाळासाहेब आडागळे हे गेल्या पंधरा वर्षीपासून पत्रकारीतेच्या माध्यामातून आपल्या लेखणीने अनेक अन्यायाला वाचा फोढण्याचे काम केले आहे. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना पत्रकार क्षेत्रातील राज्यस्तरीय सत्यशोधक पुरस्काराने प्रदान करण्यात येणार आहे. तसेच कमी कालावधीत आपल्या अभिनयाच्या जोरावर उल्लेखनीय काम करणारी अभिनेत्री प्राची सोनवणे हिच्या कार्याची दखल घेत, त्यांना साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या जयंती निमीत्त कला क्षेत्रातील राज्यस्तरीय सत्यशोधक हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

अभिनेत्री प्राची हिने कला क्षेत्रात निभावलेली भूमिका अतिशय उल्लेखनिय आहे. दरम्यान सत्यशोधक पुरस्कार सोहळ्यास बीडचे मा. पालकमंत्री धनंजय मुंडे, गेवराई मतदार संघाचे मा.आ.अमरसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थित संपन्न होणार आहे. अशी माहिती महाराष्ट्र आधार सेना संघटनेचे संस्थापक अध्यक्ष ,संपादक दिपक थोरात , उपसंपादक उद्धव आरे यांनी दिली आहे.

# विकास केलाच नाही'... मग आढावा कसला ?... "क्या विकास पागल हो चुका है"... कहां गया ये विकास ?

### लोकप्रतिनिधींना बीड शहर बचाव मंचाचा संतप्त सवाल.

**बीड । प्रतिनिधी**

कोणी लोकप्रतिनिधी विकासाचे आढावे घेत फिरतोय. विकास केलाच नाही मग हे आढावेच कसले...? आम्हा जनतेला काही कळायला मार्ग नाही. विकासाचे आढावेच घ्यायचेआहेत ना तर या मग एकदा जमिनीवर, बीड शहराच्या गल्लोगल्ली लोकांच्या दारोदार एकदा फिराच... आढावा नक्कीच भेटेल. आढावा भेटेल तुमच्या सगळ्या क***** कर्तुतीचा, तुमच्या सगळ्या चाळीस वर्षाच्या



कारकिर्दीचा... विकास घरी झोप घेऊन स्वप्नात होत नसतो.. आजकाल विकास स्वप्नात तर येत नाहीये ना.. काय झाल आहे या विकासाला.. कुठे गेला आहै हा विकास.. लोकप्रतिनिधींच्या स्वप्नात तर जाऊ लागला नाही ना.... असं तर होत नाही ना रात्री स्वप्नात विकास केला आणि सकाळी उठून आढावे घेत फिरू लागले आहेत... अवघडच झाले आहे या विकासाचे... शोधूनही सापडत नाहीये... कहां गया है ये विकास'...? आज कल क्या करता है और कहा रहता है ये विकास..?? क्या विकास सचमुच पागल हो चुका है.. मुझे सभी आवाम की तरफ से इन लोकप्रतिनिधींयो को पूछना है कि ये आढावे लेते वक्त, ये पागल हो चुका विकास कहीं मिला क्या..?? हम सब को भी आके देखना है ये विकास होता कैसा है, दिखता कैसा है, रहता कहा पे है, जाता कहा पे है, और आता कहा से है और किसके किसके सपनो मे आता है...!

खरंचच आढावे घेणाऱ्यांना बीड शहर बचाव मंचाच्या वतीने व सर्व जनतेच्या वतीने एकच प्रश्न आहे कुठे गेला आहे हा विकास.. आढावे घेताना तरी सापडला का... काय खरंचच विकास पागल' झाला आहे.. सच मे विकास' पागल हो चुका है..? आढावे घेताना तरी हा कुठे भेटला का..? आढावे घेताना विकासाला भेटून तुम्ही जर धन्य झाला असाल तर आम्हालाही सांगा.. त्याची भेट घ्यायची आहे आणि आम्हालाही धन्य व्हायचे आहे. जे लोकप्रतिनिधी जनतेची दिशाभूल करून, व फक्त दिशाभूल करण्यासाठीच विकासाचे आढावे घेत फिरत आहेत .



# महात्मा ज्योतीबा फुले यांच्या नामफलकाची विटंबना करणाऱ्यावर कठोर कार्यवाही

### महात्मा ज्योतीबा फुले सेवा संघाचे निवेदन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील राशीन या ठिकाणी अज्ञात समाजकंटकांनी महात्मा ज्योतीबा फुले यांच्या नामफलकाची विटंबना केली असल्याचे निदर्शनास आल्याने तमाम परिवर्तनवादी चळवळीत कार्यरत कार्यकर्ते आणि विविध संघटना आक्रमक झाल्या आहेत. अंबाजोगाईत याप्रश्नी अज्ञात समाजकंटकावर कठोर कार्यवाही करा अशी मागणी महात्मा ज्योतीबा फुले सेवा संघाने केली आहे. या विषयी त्यांनी उपविभागीय अधिकारी यांना बुधवारी निवेदन दिले आहे.

येथील महात्मा ज्योतीबा फुले सेवा संघाने उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांना बुधवार, दिनांक १३ ऑगस्ट रोजी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, आधुनिक भारताच्या सामाजिक क्रांतीचे जननायक, महाराष्ट्रात पुरोगामी विचारांचा समग्र संघर्ष उभा करून परिवर्तन चळवळ उभी केली. या महामानव क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीचा फुले यांच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील राशीन या ठिकाणी नामफलकाची अज्ञात समाजकंटकाकडून विटंबना करण्यात आली. या मनोवृत्तीचा जाहिर निषेध. अंबाजोगाईतील महात्मा ज्योतिबा फुले सेवा संघ, सावता परिषद, समता परिषद, सावता सेना आणि तमाम परिवर्तन चळवळीचे वाहक आम्ही या घटनेचा जाहिर निषेध करतो. अशा या विकृतींना शासनाने शोधून तात्काळ अटक करून कठोर शासन करावे असे आवाहन या निवेदनाद्वारे शासनाकडे करीत आहोत. महाराष्ट्रात आणि देशभरात या मनोविकृत शक्ती या देशातील परिवर्तन चळवळीवर आणि महामानवांवर सातत्याने हल्ले करताना दिसून येत आहेत. महाराष्ट्रातील परिवर्तन विचारधारेचे वाहक यापुढे अशा मनोविकृतींना सहन करणार नाहीत. अशा घटनांचा जाहिर निषेध करून यापुढे जर अशा घटना सुरूच राहिल्या तर परिवर्तन चळवळ यापुढे रस्त्यावर उतरून तिव्र अंदोलन करेल असा इशारा सदरील निवेदनाद्वारे शासन व प्रशासनाला देण्यात आला आहे. या निवेदनावर एस.ए.बनसोडे, डॉ. सुरेश आरसुडे, बालासाहेब मसने, अविनाश उगले, गणेश जाधव, मधुकर घोडके, राम वसंतराव घोडके, मंगेश बलुतकर, निवृत्ती जिरे, पवन घोडके, नवनाथ माळी, महेश सपाटे, बाळासाहेब फुलझळके, आशुतोष घोडके,

# राजमाता जिजाऊ महाविद्यालय मध्ये हर घर तिरंगा घर घर तिरंगा अभियानाअंतर्गत ध्वजारोहण संपन्न

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये दि. १४ ऑगष्ट २०२५ रोजी महाविद्यालयामध्ये उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थित कर्मचाऱ्यांनी राष्ट्रगीत म्हटले गेले. यावेळी प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर, कार्यालय अधीक्षक श्री. सुभाष वायाळ



यांबरोबरच एनसीसी कॅडेट्स, सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

# अंथरवण पिंपरी आश्रम शाळेत शालेय गणवेश व शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

बीड पासून जवळच असलेल्या श्री सद्गुरु बंजारा सेवा संघ बीड संचलित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा तथा दीनानाथ बालक आश्रम अंथरवण पिंपरी (तांडा) ता. बीड येथे दिनांक १३ ऑगस्ट २०२५ बुधवार रोजी शालेय गणवेश व शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम संपन्न झाला.



या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य खंदारे सर तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष दिनेशराव पवार, मुख्याध्यापक शिंदे सर, पर्यवेक्षक जवरे सर हे व्यासपीठावर अग्रस्थानी होते. सर्वप्रथम हरितक्रांतीचे प्रणेते कै. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. तदनंतर मान्यवरांच्या शुभहस्ते निवासी व दीनानाथ बालकाश्रमच्या विद्यार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना दिनेशराव पवार म्हणाले की, मिळालेल्या शैक्षणिक साहित्याचा योग्य वापर करून नियमितपणे अभ्यास करावा. कठोर परिश्रम जो करेल तोच यशाची फळे चाखेल. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिंदे व्ही. एन. यांनी तर आभार प्रदर्शन पवार सर यांनी मानले. या कार्यक्रमास पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आश्रम शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती वंदना. व्ही. ज़ोशी दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १२८४/२०२५**

**विलास पि. मारुती भोसले वि. निरंक**

अर्जदार- १. विलास पि. मारुती भोसले, वय- ४५ वर्षे, धंदा-मजुरी, रा. पोखरी पो. लिंबागणेश ता.जि.बीड, २. प्रकाश पि. मारुती भोसले, वय- ४२ वर्षे, धंदा-मजुरी, रा. सदर, ३. पानकवर भ्र. विश्वनाथ गंगावणे, वय- ४२वर्षे, धंदा-घरकाम, रा. घर नं. ४७१, डोंगरीम सालकेट दक्षिण गोवा, नेवेलीम गोवा ४०३७०७, ४. शोभा भ्र. माणिक शेंडगे, वय- ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. आर. एस. जेतवन नगर, सुश्यांत किराणा स्टोअर जवळ, मोहोने, अंबीवली पु. कल्याण ठाणे. ५. पार्वती भ्र. मारुती भोसले, वय-७७ वर्षे, धंदा- घरकाम, रा.पोखरी पो. लिंबागणेश ता.जि.बीड

विरुध्द

गैरअर्जदार: निरंक

प्रकरणः भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत मारोती बाळा भोसले यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत मारोती बाळा भोसले हे दिनांक ०१/०९/२०२१ रोजी राहत्या घरी मौजे पोखरी ता. जि. बीड येथे दिर्घ आजाराने मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ व २ हे मयताचे मुले असुन अर्जदार क. ३ व ४ या मयताच्या विवाहीत मुली आहेत. तसेच अर्जदार क्र. ५ ही मयताची पत्नी आहे. अर्जदारांशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहु मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे मारोती बाळा भोसले रा. पोखरी ता. जि. बीड यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी. पुढील तारीख ०१ /१०/२०२५.

आज दिनांक ११/०८/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

(मार्फत- ॲड. एल. आर. गंगावणे)

आदेशावरून.
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

शिक्का

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. व्ही. सी. जोशी ९ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर बीड ता. जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १२९४/२०२५**

**बाळु गोविंद डोरले वि. निरंक**

ज्यापेक्षा गोविंद जगन्नाथ डोरले हे दिनांक २८.०९.२०१० रोजी बेलखंडी (पाटोदा) ता.नि. बीड येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार- १.बाळु पि. गोविंद डोरले, वय-३८ वर्षे,धंदा शेती, रा. बेलखंडी (पाटोदा), ता.जि. बीड. २. कल्पना अरुण मोरे, वय ३५ वर्षे धंदा घरकाम, रा घारगाव ता. परंडा जि. धाराशीव, ३.दत्तात्रय पि. गोविंद डोरले, वय-२९ वर्षे, धंदा शेती, रा. बेलखंडी (पाटोदा), ता.जि. बीड.

अर्जदार क १ ते ४ हे मयत नामे गोविंद जगन्नाथ डोरले यांची मुले असून, अर्जदार के. ५. मयताची पत्नी आहे. मयताचे आई वडील हे फार पूर्वीच मयत झाले आहेत. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहू मयत

गोविंद जगन्नाथ डोरले यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख २२/०९/२०२५ आहे.**

आज दिनांक १२ ऑगस्ट २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

मार्फत - अँड. डी. एस. गायकवाड

आदेशावरून.
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

शिक्का

## जाहीर प्रगटन

**मा.श्रीमती ए.बी. निवारे ९ वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ७६२ / २०२५**

**केशरबाई वि. निरंक**

मागणी:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्जदारः (१) केशरबाई भ्र. सुर्यभान बांगर, वय ८० वर्षे, धंदा घरकाम, रा. खंडाळा ता.जि. बीड, (२) अशोक पि. सूर्यभान बांगर, वय - ५२ वर्षे, धंदा शेती, रा. खंडाळा ता.जि. बीड, (३) लक्ष्मण पि. सुर्यभान बांगर, वय ४२ वर्षे, धंदा शेती. रा. खंडाळा ता.जि. बीड, (४) शोभा प्र. दिनकर जायभाये, वय ५१ वर्षे धंदा घरकाम, रा. म्हाडा कॉलनी, सिडको कॉलनी, छ. संभाजीनगर, ता. जि. छ. संभाजीनगर (५) लता भ्र. अजुन तोंडे, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. सोनपेठवाडी ता.जि. बीड. (६) सिंधुबाई भ्र. कल्याण हांगे, वय ४४ वर्षे, धंदा घरकाम, प्रा. रोहाउस नं. बी. ३. ओमसाई नगर, कमलापुर छ. संभाजीनगर, ता. जि. छ. संभाजीनगर

विरुध्द निरंक

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या यावतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी

ज्याअर्थी मयत नामे सुर्यभान पि. कुंडलिक बांगर, राहणार खंडाळा ता. जि. बीड हे दिनांक २६/०२/२०१९ रोजी खंडाळा ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क.१ ही मयत नामे सुर्यभान पि. कुंडलिक बांगर यांची पत्नी, अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुळे अर्जदार क. ४ ते ६ या मयताच्या मुली आहेत.

मयत नामे सुर्यभान पि. कुंडलिक बांगर यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकी निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनर कळविण्यात येते की. सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हंत असे कोणास समजविण्यात असेल तर जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवा आणि खार: असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू को अर्जदार ह हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदर मयत भारत पि. सुखदेव जगतार यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी

**सदर प्रकरणात पुढील तारीख २७/०६/२०२५ आहे**

आज दिनांक ०५/०५/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

मार्फत- श्री. जी. एम. केकाण

आदेशावरून.
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

शिक्का

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. अ.सं. जगताप, दिवाणी न्यायाधीश क. स्तर शिरूर कासार यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नं. २०६/ २०२५**

**पठान ताहेराबी वि. निल**

अर्जदार :१. श्रीमती. पठाण ताहेराबी आनसू, वय-७५ वर्षे, धंदा-घरकाम रा. मानुर ता. शिरूर कासार, जि. बीड, २. पठाण शेरखान आनसू वय - ४२ वर्षे, धंदा-शेती, रा. सदर ३. पठाण खॉजू आनसू वय-३५ वर्षे, धंदा-शेती, रा. सदर ४. पठाण अमर आनसू, वय - ३२ वर्षे, धंदा-शेती, रा. सदर

**अर्ज: बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाण मिळणे बाबत..**

ज्यापोक्षा मयत नामे आनसु रतनखॉ पठाण यांचा मृत्यू दि. २६.१०.२०२४ रोजी मौजे मानूर, ता. शिरूर कासार, जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हे मयताचे एकमेव कायदेशीर वारस आहेत असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयत यांचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदर कोर्ट अर्जदार यांचे हक्कावदल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयत यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक २४.०७.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २६.०८.२०२५ ही आहे.

(मार्फत- ॲड. डी. एम. रोटे)

आदेशावरून.
(स्वाक्षरीत)
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क.स्तर, शिरूर का.

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

शिक्का

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. कृष्णाराव के. पाटील सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नंबर १२२७ / २०२५**

**पारस वि. निरंक भारतीय वारसा कायदा कलम ३७२ प्रमाणे वारस प्रमाणपत्र**

अर्जदार- १) पद्मिनबाई भ्र. बन्सी मोरे, वयः ७५ वर्षे, धंदाः घराकम, रा. उमरी ता. जि. बीड २) भागवत पि.बन्सी मोरे, वयः ५५ वर्षे, धंदाः शेती, रा. मंत्री कन्स्ट्रक्शन, पेठ वीड ता. जि. बीड ३) अशोक पि. बन्सी मोरे, वयः ५१ वर्षे, धंदाः शेती, रा. उमरी ता. जि. बीड ४) कल्याण पि. बन्सी मोरे, वयः ४६ वर्षे, धंदाः शेती, रा. उमरी ता. जि. बीड ५) सुवर्णा भ्र. बंडु दुबाले, वयः ४३ वर्षे, धंदाः घरकाम, रा. सांडरवन ता. जि. बीड ६) प्रमिला भ्र. रमेश माने, वयः ४९ वर्षे, धंदाः घरकाम, रा. ताडसोन्ना ता. जि. बीड ७) मिना भ्र. दत्तात्रय कदम, वयः ३७ वर्षे, धंदा घरकाम, रा. येळंबघाट ता. जि. बीड

विरुध्द निरंक

**मागणी :- भारतीय वारसा कायदा कलम ३७२ नुसार**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नामे बन्सी पि.लक्ष्मण मोरे, यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी मयत नामे बन्सी पि.लक्ष्मण मोरे, हया राहणार उमरी, ता. जि. बीड, हया दिनांक १३.०४.२०२१ रोजी जिल्हा रुग्णालय बीड ता. जि. बीड येथे मयत झालेल्या आहेत. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क. २ ते ४ हे मयताचे मुले तर अर्जदार क. ५ ते ७ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. वरील अर्जदारा शिवाय मयतास इतर कोणीही वारस नाहीत.

मयत बन्सी पि.लक्ष्मण मोरे, यांचे मृत्युसमयी त्यांचे नांवे स्टेट बँक ऑफ इंडिया, नगर रोड बीड मध्ये खाली दर्शविलेल्या परिषिश्ट अ प्रमाणे रक्कम शिल्लक आहे.

परिशिष्ट- अ- अ.क्र., १. मयत खातेदारांचे नाव- बनसी पि.लक्ष्मण मोरे, बँकेचे नाव व खाते क्रमांक - स्टेट बँक ऑफ इंडिया शोखाः राजीव गांधी चौक,नगर रोड, बीड. ६२२९१६९७७०९, जमा असलेली रक्कम एकुण- रु १८,४४१/-

मयत बन्सी पि.लक्ष्मण मोरे यांचे निधन झाले. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत बन्सी पि.लक्ष्मण मोरे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. **सदर प्रकरणात पुढील तारीख ११/०९/२०२५ आहे.**

आज दिनांक १४/०८/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

(मार्फत- श्री. भालेराव टी. बी.)

आदेशावरून.
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

शिक्का

दैनिक **मराठवाडा पत्र**
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शुक्रवार, दि. १५ ऑगस्ट २०२५ ● पान ४

# लोकनेते विनायकराव मेटे यांना पुण्यतिथी निमित्त जड अंत:करणाने श्रद्धांजली अर्पण

**बीड । प्रतिनिधी**

शिवसंग्राम चे संस्थापक अध्यक्ष लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या पुण्यतिथीनिमित्त बीड येथील त्यांच्या स्मृतीस्थळी त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली याप्रसंगी सामाजिक, राजकीय आणि समाजातील विविध घटकातील मान्यवर मोठ्या उपस्थित होते.

मराठा आरक्षणासह मुस्लिम,धनगर आरक्षणासाठी अविरत लढा देणारे लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांचा १४ ऑगस्ट २०२२ साली मराठा आरक्षणासाठी होऊ घातलेल्या मुंबई येथील बैठकीला जाताना दुर्दैवी अपघात झाला यात त्यांची प्राणज्योत मालवली. बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र असलेल्या विनायकराव मेटे यांचा जन्म राजेगाव या गावी झाला पोटाची खळगी भरण्यासाठी मुंबईत मोलमजुरी करण्यासाठी गेलेल्या मेटे साहेबांनी ३५ वर्ष राजिकाय आणि सामाजिक पटलावर आपले कर्तृत्व सिद्ध केले. शिवस्मारक आणि आण्णासाहेब आर्थिक



विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी ही त्यांनी मोलाची कामगिरी बजावली त्याचबरोबर बीड शहर आणि जिल्ह्यातील ज्वलंत प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी सातत्याने नेहेमीच प्रयत्न केला अशा बहुआयामी नेतृत्वाच्या जाण्याने समाजात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. आज त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त असंख्य कार्यकर्ते चाहते यांनी एकत्र येत जड अंतः करणाने त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. या प्रसंगी शिवसंग्राम अध्यक्ष ▶ उर्वरित पान २ वर

## थोडक्यात...

### रस्त्यासाठी बेमुदत उपोषण

**भूम । प्रतिनिधी**

संगमेश्वर उध्व मांजरा प्रकल्प डोकेवाडी भूम या प्रकल्पामुळे मुख्य रस्ता पिंपळगाव घाट ते ईट ता. भुम डॅम मध्ये गेल्यामुळे पर्यायी रस्ता पिंपळगाव घाट मार्गे पांढरेवाडी ईट ला जोडला आहे. १९९२ साली शेतकऱ्यांना मावेजा देऊन जमीन संपादीत अधिग्रहण करून घेतली आहे . परंतु शेतकऱ्याने शंभर फूट १०० फूट रस्ता आडवुन मानेवाडी पिंपळगाव घाट,वाढवणा, रूईगव्हाण, माळेवाडी, पांढरेवाडी, ईट, या गावांचा संपर्क तोडला आहे गेले तीस वर्ष हा रस्ता उपविभागीय तावरजा कार्यालय भूम यांना हा रस्ता करणे झाले नाही म्हणून ११. ८ .२०२५ रोजी माननीय प्रकल्प संचालक ता व र जा शिरूर कार्यालय भूम यांना अर्ज देऊन अडवलेला रस्ता शंभर फूट संबंधित शेतकऱ्याचे चार गुंठे घेऊन पूर्ण करावा .यासाठी १५/८/२५ रोजी १०.००वाजता बेमुदत उपोषण करणार आहेत आहे प्रसिद्धि पत्रकाद्वारे निवेदन दिले आहे.

### सुरज चव्हाण ची नियुक्ती करणाऱ्या तटकरे च्या तोंडाला काळे फासणार

**छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक रोमन यांचा इशारा**

**बीड । प्रतिनिधी**



खासदार सुनील तटकरे यांच्या पत्रकार परिषदेच्या वेळी छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांनी पत्ते फेकल्याने तत्कालीन राष्ट्रवादीचे युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण आणि काही कार्यकर्त्यांनी मिळून विजयकुमार घाडगे यांना मारहाण केली होती. घाडगे यांना रुग्णालयात दाखल करावे लागले होते. या मारहाणीची दखल घेत उपमुख्यमंत्री अजित पवारांनी सूरज चव्हाण याला पक्षातून निलंबित केले होते. मात्र सुनिल तटकरे यांनी पुन्हा सुरज चव्हाण याची नियुक्ती करून त्याला मोठ पद दिल आहे. याचा निषेध छावा मराठा संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे. सुनिल **तटकरे बीडमध्ये आल्यानंतर त्यांच्या तोंडाला काळे फासू असा इशारा छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक रोमन यांनी दिला आहे. २१ जुलैला अजित पवारांनी सूरज चव्हाण यांचे निलंबन केले. मात्र, या निलंबनाला तीन आठवडे होण्याच्या आधीच सूरज चव्हाणचे यांचे थेट पदोन्नती करत त्याची राष्ट्रवादी काँग्रेसच्या सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली. सुनिल तटकरे यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीचे पत्र देण्यात आले. चव्हाण यांना निलंबित केल्यानंतर पुन्हा त्यांच्यावर मोठी जबाबदारी टाकत सरचिटणीस केल्यानंतर सुनिल तटकरे यांच्यावर टीका होत आहे. छावाचे जिल्हाध्यक्ष अशोक रोमन यांनी या नियुक्तीवरून संताप** व्यक्त केला आहे. ते म्हणाले मारामाऱ्या करणाऱ्यांना पक्षातून हाकालपट्टी करण्याऐवजी जर मोठं पद दिले जात असेल तर आम्ही- जेंव्हा केंव्हा सुनिल तटकरे बीडमध्ये येतील तेंव्हा त्यांच्या तोंडाला काळे फासणार आहोत.

# पीकविमा कंपनी कार्यालयावर धनंजय गुंदेकर यांच्या नेतृत्वाखाली हजारो शेतकरी पोहोचले

## ऑनलाइन तक्रारी देऊनही पीकविम्यापासून अलिप्त, कंपनी प्रतिनिधी म्हणाले ; ३० ऑगस्टपर्यंत रक्कम देऊ..!

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खरीप २०२४ पीकविमा रकमा गेल्या काही दिवसांत आल्या मात्र एआयसी कंपनीने नियमानुसार नुकसानीच्या ऑनलाइन तक्रारी देऊनही हजारो शेतकऱ्यांना पीकविमा आलेला नाही. याबद्दल शेतकऱ्यांनी पीकविमा जिल्हा कार्यालयात येऊन पीकविमा रकमा न आल्याची माहिती पीकविमा कंपनीला द्यावी असे आवाहन संचालक धनंजय गुंदेकर यांनी केले होते. या आवाहनानंतर बीड तालुकाभरासह



जिल्हाभरातून शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात जिल्हा कार्यालयावर येत कंपनीकडे आक्षेप नोंदवला. हजारोंच्या संख्येने पीकविमा कंपनी कार्यालयाच्या समोर शेतकऱ्यांनी पीकविमा पावती व आधार कार्ड झेरॉक्स घेऊन धडक दिली. यावेळी पीकविमा कंपनी जिल्हा प्रतिनिधी यांनी शेतकऱ्यांचा पीकविमा पावती क्रमांक व आधार क्रमांक घेत कंपनी वरिष्ठांकडे पाठविले असून येत्या ३० ऑगस्ट पर्यंत पात्र शेतकऱ्यांना पीकविमा रक्कम देण्यात येईल असे यावेळी जाहीर केले आहे. ३० तारखेनंतर जर पीकविमा रक्कम दिली नाही तर आंदोलन करण्यात येईल असा इशारा यावेळी धनंजय गुंदेकर यांनी दिला आहे.

### न समजलेले आई बाप विषयावर प्रसिद्ध व्याख्याते डॉ.वसंत हंकारे सर यांच्या व्याख्यानस उपस्थित राहाण्याचे आव्हान

**वडवणी । प्रतिनिधी**

देवदूत प्रतिष्ठान वडवणी च्या वतीने डॉ.ओमप्रकाश शेटे साहेब अध्यक्ष आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र राज्य समिती यांच्या वाढदिवसानिमित्त दिनांक १६/०८/२०२५ शनिवार रोजी सकाळी १०. वा.राम मंदिर चौक वडवणी येथे महाराष्ट्र राज्यातील प्रसिद्ध व्याख्याते डॉ वसंत हंकारे सर यांचा चला जगूया आनंदाने सुखी जीवनाचा मुलं मंत्र शिकवणारे , न समजलेले आई बाप विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे डॉ.ओमप्रकाश शेटे साहेब आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र राज्य समिती चे अध्यक्ष, कार्यक्रमाचे अध्यक्ष ह.भ.प.नवनाथ महाराज चिनके, व श्री बंडू खांडेकर देवदूत प्रतिष्ठान अध्यक्ष यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे तरी वडवणी शहरातील सर्व तरुण, विध्यार्थी , पालकांनी उपस्थित राहावे असे आवाहन देवदूत प्रतिष्ठान वडवणी च्या वतीने करण्यात आले आहे.

### राजवीरच्या आकस्मिक निधनाने शिवाजीनगर परिसरात शोक कळा

**बीड । प्रतिनिधी**

येथील राजस्थानी विद्यालयात इयत्ता सहावी वर्गात शिक्षण घेत असलेल्या अत्यंत चुणचुनीत व हजर जबाबी विद्यार्थी चि. राजवीर ज्ञानेश्वर शिंदे यांच्या आकस्मिक निधनाने शाळा, शिवाजीनगर परिसरात बुधवारी शोककळा पसरली तर सर्वत्र दुःख व्यक्त करण्यात आलं.



शिवाजीनगर परिसरात राहणारे ज्ञानेश्वर शिंदे व वर्ष न्यानेश्वर शिंदे यांचा मुलगा राजवीर राजस्थानी विद्यालयात इयत्ता सहावी वर्गात शिक्षण घेत होता अतिशय हुशार व चाणाक्ष कुशाग्र बुद्धिमत्तेचा म्हणून सर्व दूर परिचित होता .दिनांक १२ ऑगस्ट ला त्याला ताप आल्याचं व हा ताप डोक्यात उतरल्याचं उपचार ▶ उर्वरित पान २ वर













